म. ग्रं. सं. ठाणें
. काव्य
ं. 5/91
... 1833

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ..........




REFBK-0004937
REFBK-0004937

साहित्य संपादक मंडळाचें पहिलें पुस्तक

[ काव्य-संग्रह ]

# ओहळ

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १०६६
ता. २७-५-३३
ठाणे

संपादक:—रा. नी. बढे

(अध्यक्ष सा. सं. मंडळ, नागपूर)

8836
REFBK-0004937
REFBK-0004937

फेब्रुवारी १९३३

किंमत १२ आणे

प्रकाशक:—मल्हार नारायण काळे
( सदस्य–साहित्य सं. मंडळ नागपूर )

[ पुस्तकाचे सर्व हक्क मंडळाचे स्वाधीन आहेत ]

मुद्रक:—बा. रा. मोडक
संपादक 'मुलांचें मासिक'
माधव प्रिंटींग प्रेस
नवी शुक्रवारी, नागपूर

# ‘ मर्मर–ध्वनि ’

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.

वाङ्मयाच्या वाढत्या अभिरुचीस योग्य वळण लावण्यासाठीं संघटित स्वरूपाची एखादी संस्था असणें किती आवश्यक आहे हें नव्यानें सांगायला नकोच परंतु नागपुरांत पूर्वी अशी एकही संस्था नव्हती. ही उणीव भरून काढण्याचा अल्प प्रयत्न करावा या उद्देशानें १९२८ सालीं ‘ साहित्य संपादक मंडळ ’ स्थापन करण्यांत आलें. मंडळाच्या निरनिराळ्या विभागाकडून होतकरू कवी लेखकांना उत्तेजन देण्यासाठीं आजवर आम्हीं बराच यत्न केला. मंडळाचें हस्तलिखित मासिक ‘ काव्यकला ’ यांतून बऱ्याच वरच्या दर्जाचें लिखाण प्रकाशित होऊं लागलें. श्री. माधव ज्यूलियन् कविभूषण खापर्डे, खांडेकर ह-षे, माडखोलकर, आ. रा. देशपांडे, बेहेरे. प्रो. पेंडसे इत्यादि सन्मान्य साहित्यीकांचें अनुकुल अभिप्राय मिळाल्यामुळेंच मंडळांतील कवींच्या वेचक कवितांचा संग्रह प्रसिद्ध करण्याचें धाडस आम्ही करीत आहोंत.

प्रस्तुत कार्यकारी मंडळानें संस्थेचें संकुचित क्षेत्र ओलांडून तिला प्रातिनिधिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला व त्यामुळेंच नागपूरच्या रहिवाशांना मंडळाचा विशेष परिचय झाला. जाहीर कार्यक्रम शाखेतर्फे यंदा श्री. अनंत हरी गद्रे, हडप, ग. ग. ह-षे आदिकरून विद्वानांची विचार–परिप्लुत व्याख्यानें झालीं. तसेंच कवि यशवंत यांच्या काव्यगायनाचा लाभ आम्हांला घेतां आला. खंडकाव्याची नूतन प्रथा पाडण्याचें श्रेय बहुतांशीं मंडळालाच आहे. ज्या श्रेष्ठ कवींना स्वतःची काव्यकृती गाऊन दाखविणें शक्य नसतें अशांच्या उत्कृष्ट कृती रसिकांना अधिक आकर्षक होण्यास असले कार्यक्रम निःसंशय आवश्यक आहेत. या दृष्टीनेंच कविवर्य चंद्रशेखर कृत ‘ काय हो चमत्कार ’ हें हृदयंगम खंडकाव्य श्री. राजा बढे ह्यांनी गाऊन दाखविलें.

सरतें शेवटीं ज्या अनेक प्रेमळ व उदार हितचिंतकांनीं आपलेपणाच्या भावनेनें आम्हाला मदत केली त्यांचे मनःपूर्वक आभार मानून हें निवेदन संपवितों.

सर्वांचा कृपाभिलाषी

**वसंत राजे**

कार्यवाह–सा. सं. मं. नागपूर.

# अवगाहनापूर्वी—

प्रिय वाचक

साहित्य–संपादक–मंडळांतील, नवोदित व उदयोन्मुख कवी कवयित्रींच्या भावगीतांचा संग्रह आपल्या हातीं देतांना मला अत्यंत आनंद होत आहे. अशा प्रकारचा संग्रह प्रसिद्ध करावा ही योजना दोन वर्षांपूर्वीची, पण तिला मूर्तस्वरूप मात्र आज मिळत आहे. साहित्य संपादनाचा आमचा मूळ उद्देश अल्पांशानें तरी आज सफल झाला आहे. अज्ञात प्रदेशांतून वहात असणाऱ्या चिमुकल्या प्रवाहांचा संगम घडवून आणून 'ओहळ' रूपानें जनदृष्टीपुढें आणण्याचें भाग्य मला लाभलेलें आहे.

'या आधुनिक कवितांत काय राम आहे हो ! स्त्री हें काव्य आहे, या सिद्धांतावर कवितेची उभारणी, जनानखान्यांतले कांहीं वेंचक शब्द. आणि स. ला. ना. ते अशी विभक्ती प्रत्ययें लावून केलेली शृंगारिक रचना, त्यांत भक्तीचा जिव्हाळा, कल्पनाविलास अन् नाविन्य कोठून आढळणार ?' अशी ठाम समजूत करून आधुनिक काव्याकडे कानाडोळा करणाऱ्या भावनाशून्य तर्कपंडितांना या ओहळांतील पाण्याचा विटाळ होण्याचाही संभव आहे. कारण रम्य पुष्पमाळेपेक्षां रुद्राक्षमाळेची त्यांना जास्त आवड ! तसेंच मनांतून अत्यंत प्रिय असणाऱ्या गोष्टींना नावें ठेवणारे कांहीं घातकी टीकाकार परिणामाकडे दुर्लक्ष करून आपली कार्यतत्पर कुठार या 'पाण्यावरही हाणण्यास कमी करणार नाहींत, पण तरुण कवींच्या कवितांचा सहानुभूतीपर विचार करून 'फेंसाळत गाईल जिथें ओहळ गाणीं' असें काव्यचरण गुणगुणत 'चिमणी खोपटें' बांधून रममाण होणारे कांही आनंदी जीव देखील सांपडतीलच.

पंचवीशीच्या आंत बाहेरीलच बहुतेक कवी असल्यामुळें यौवनलभ प्रवृत्तीमुळें प्रणयरंगाच्या कोवळ्या छटा त्यांच्या काव्यांत

दिसून आल्यास तो दोष क्षम्य होय नव्हे तो मुळीं दोषच नव्हे.... सारेच सिद्धार्थाप्रमाणें मोहालिप्त जितेंद्रिय मुक्तात्मे कुठून असणार !

संस्कृत कवितांमधून अधिकृताकडून केला गेलेला शृंगार आणि राधाकृष्णांच्या नांवावर केलेली 'रासक्रीडा' नि 'कंदुक क्रीडा' इत्यादि सारखा उत्तान काव्यप्रकार मोठ्या भक्तीनें आळवितां येतो तर मग निव्वळ भावनोत्कटतेनें अश्लीलतेला न शिवतां, कलेच्या कोमल तंतूंनीं विणलेल्या आधुनिक शृंगार काव्यावर सर्रास नाक मुरडण्यांत काय अर्थ ?

यांत संग्रहित केलेल्या कांहीं कवि आणि कवयित्रींच्या काव्यकृती, वागीश्वरी, रत्नाकर, यशवंत, मनोरंजन इत्यादि नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या असल्यामुळें त्या महाराष्ट्रीय रसिकांना सुपरिचित आहेतच. श्री. ना. घ. देशपांडे यांची 'शीळ' श्री. गोविंदराव जोशांच्या ग्रॅमोफोन रेकार्डमुळें तर 'राना रानांत' गेलेली आहे. ओहळाच्या गुणगुणण्यांत तरुलतांकावरील पिकसारिकांचा मधुर कलरव निनादित झाल्यामुळें वाचकांना तो श्रवणमधुर वाटेल अशी आशा आहे. मंडळावर ज्यांचें विशेष प्रेम आहे असे सन्माननीय सदस्य कविवर्य जयकृष्ण उपाध्ये, रा. रा. मोडक, सहस्रबुद्धे आणि सौ. मनोरमाबाई नावलेकर यांनींही आपल्या कविताकन्यकांना ओहळांत अवगाहन करण्याची परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

पुस्तकाचें मुद्रण व सजावट परंपरेप्रमाणें दुसऱ्या ठिकाणीं न होतां ती नागपूरलाच झाली आहे, हाच या काव्यसंग्रहाचा विशेष होय.

पुस्तकांच्या साजशृंगाराचा आणि मुद्रणाचा भार तर मुलांच्या मासिकाचे संपादक श्री. बा. रा. मोडक यांच्यावरच होता. त्यानीं अगदीं आपलेपणानें केलेल्या साह्याबद्दल दोन वाक्यांतच उतराई होऊं पाहणें म्हणजे माझ्या कृतघ्नपणाचें प्रदर्शन मात्र होईल.

कांहीं उशिरां आलेल्या कवितांचा यांत समावेश न करता आल्यामुळें अत्यंत दिलगीर आहोंत.

पुस्तकाची मुख्य अडचण निवारण्याच्या कामीं माझ्या स्नेह्यांनीं केलेली मदत मी कसा विसरेंन? केवळ नांवासाठीं मदत न केलेल्या प्रेमीजनांचा मी अत्यंत रूणी आहे. पण चक्रवाढ व्याजानें या रूणाची वृद्धी व्हावी अशी मात्र माझी मनापासून इच्छा आहे. त्यांच्या आग्रहास्तवच हा निनांवी प्रकार स्वीकारावा लागला. ओहळांत प्रतिबिंबित झालेली ही स्नेहशीतल चंद्रिका अशीच अखंड राहो अशी कुणाची अपेक्षा नसणार?

आणि अखेर, ही काव्यमालिका शिरीं धारण करावयाची नसली तरी तिला पायदळीं तुडवूं नये आपल्या कंठांत लाडिक मिठी मारून हृदयावरच लोळूं द्यावी अशी एकवार रसिकांना विनंती करून हात आवरता घेतों.

आपला विनीत

**रा. नी. बढे**

अध्यक्ष—सा. सं. मं. नागपूर

# जलकणिका


| | | पृ. सं. |
|---|---|---|
| संपादक | रसिकांस | १ |
| कवि–ज. के. उपाध्ये | मंगमोत्सुका | २ |
| कवि–शं. बा. नेरकर, बी. ए. | निद्रिस्त कवितेस | ३ |
| | सौंदर्य देवतेस | २९ |
| | मातृभूमीस | ३० |
| कवि–भ. श्री. पंडित, एम् ए. | महदन्तर | ५ |
| | चित्रलेखा | १३ |
| | कसें होईल? | १८ |
| | पाळत | २३ |
| | वाक्प्रहार | ५१ |
| | सविकल्प समाधी | ६३ |
| कवि–ना. घ. देशपांडे, बी. ए. | मालन | ६ |
| | गूढगायन | १५ |
| | शीळ | २६ |
| | तळमळ | ५३ |
| | आज जाऊं दूर रानीं | ५८ |
| कवि–अनंत ओक | पुष्पगुच्छ | ८ |
| | तपश्चर्या | २७ |
| | दोन चित्रें | ५४ |
| कवि–ज्ञानेश्वर साधु | ताज | १० |
| | गतित पुण्प | ३९ |
| कवि–राजा वढे | तिचे अलंकार | १२ |
| | कलहान्तरिता | २४ |
| | कल्लोलिनी | ३४ |
| | प्रतिक्षा | ५१ |
| | अंतिम इच्छा | ५७ |

| | | |
|---|---|---|
| कवि–गो. रा. दोडके | मी सहज बोललों | १४ |
| | एकांतांतील अश्रू | ५० |
| कवि–ना. बा. शास्त्री | अनन्य भाव | १५ |
| | दूर दूर कोठेतरी | २२ |
| कवियित्री–कु. कमल बढे | लपंडाव | १६ |
| कवि–करंबेळकर | येना! राग तुझा हा पुरे! | १७ |
| | परित्यक्ता | ३० |
| कवि–बंभर | जा ऽ मेलं! | २० |
| ,, दिनकर मुलकरुवार | चालूं वाट कशी? | २८ |
| ,, केशव | अरुण | ३२ |
| ,, के. मा. आराधे | एका ओसाड बागेंतील वसंत | ३७ |
| | हृदयिं तुझ्या जर प्रीती नसे | ४४ |
| कवि–श्रीराम | तिळगूळ | ३८ |
| ,, य. वा. शास्त्री | समर्पण | ४१ |
| ,, रामभजनी | कां चंद्रा ? | ४३ |
| कवियित्री कु. दमयंती थेरगांवकर | वर्षा | ४५ |
| सौ. मनोरमाबाई नावलेकर | बा वसंतराया– | ४६ |
| | मी गांधीसंगे– | ६२ |
| कवि–ना. मा. सरपटवार | निरोप घेतांना | ४८ |
| ,, शंकरलाल अगरवाल | गरिबाचें गाणें | ४९ |
| ,, बा. रा. मोडक, एम्. ए. एल्. टी. | भारतमाता | ५५ |
| कवि–पु. ना. वीरकर | मूहर्तं ज्वलितं श्रेय | ५६ |
| कवियित्री कु. विमल मोहनी | लतिका ताईच्या सुमनची तक्रार | ५९ |
| कवि–वामन सहस्रबुद्धे | गुलाब कळी | ६१ |
| ,, महेश कॉल | ? | ६५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ६९३७
रसिकांस
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १०६६
ता. २८/८/३३
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६५८२
ठाणे.

# ओहळ

पथिका । ओंजळ घेच भरून

निर्मल जलमय ' ओहळ ' झुळ झुळ
वाहत आनंदून ।
वीणालंकृत हृदयशारदा
पदांबुजा भिजवून ।
प्रतिबिंबित जालि ललित चितारण
प्रेमळ भाव भरून ।
तटकटिवरती हसतिल लतिका
बघतिल वृक्ष लवून ।
घ्या रसिका हा ओघ चिमुकला
अंतरंग पाहून ।
आलिंगित जंव, रसनिर्झर नव,
सरिता सिंधु मिळून ।

# संगमोत्सुका

[राग—ललत]

ऐसाचि रहा जाउं नको ॥ धृ० ॥
नयनांचें सुख, तुझें कमलमुख
त्यासि विमुख मज करूं नको ॥
तुझें दूरपण हृदयविदारण
मीन जलाविण मारुं नको ॥
भाव—सुमन—सुखशेज पसरली
मोकलूनी तिज सुकवु नको ॥
सख्या सुन्दरा! हृदयचकोरा
इंदुदर्शना मुकवु नको ॥
हास्य मुखीचें लास्य नयनिचें
पाहूं दे मज लपवु नको ॥
बोलुं कुणाशीं पाहुं कुणाला
आग जिवाला लावुं नको ॥
जाशि घरांतुनि, जाशि करांतुनि
हृदयांतुनि परि जाउं नको ॥

—ज. के. उपाध्ये

# निद्रिस्त कवितेस--

[ जाति---वसंत ]

सोड निद्रापटल बाई --- गाच कविते गडे ! कांहीं

* * *

रवीचें हास्य दरवळलें --- ह्मणति झाला प्रभात कुणी
तुझ्या हास्याविना कोठें --- रक्तिमा ये तया अजुनी ॥
लांबवी अरुण कर तुझिया --- मनाचें दार खोलाया
रंगतें स्वप्न तव मनिचें --- चोरटा तेंच शोधाया ॥
वायु भंवतीं तुझ्या खेळे --- हेत त्याचा न काय कळे
तुझ्या कीं हास्यगंधाच्या --- लहरि गमतें लुटूनि पळे ॥
गीत शिकण्या नवें भंवती --- पांखरें गोड चिवचिवती
चराचर स्तब्ध हे बाई --- "गाच कविते गडे कांहीं" ॥

* * *

उधळुनी काव्यरस हृदयीं --- झेलुं दे स्तब्ध कमलांना
जगाला नित्य हंसवाया --- हंसवि गे मुग्ध कलिकांना ॥
जरी निजल्या अजुनि असती --- तरुंस आलिंगुनी वेली
गुंजुनी त्यांचिया कानीं --- स्वप्नबंधास मग उकली ॥
विखरुनी काव्य-रंगाला --- काढ चित्रेंहि सरसिवरी
हालत्या डोलत्या तरुची --- रंगि बेरंगि पुष्पांची ॥
तृणाच्या गालिच्या वरतीं --- नित्य नव जन्मतीं मोतीं
गुंफ वेणींत त्या बाई --- "गाच कविते गडे कांहीं" ॥

* * *

करीं घे गोड सारंगी — काव्यसंगीत गायाला
पीळ हृदयांतल्या तारा — मधुर आलाप घ्यायाला ।।
सूर मग एक एक वरी — जाउं दे ते अनंतांत
कुणा रविच्या करीं बसवी — कुणाला फेक वाऱ्यांत ।।
हृदय एकेक ताऱ्याचें — फुलवुनी हांसवी त्यांना
अहा ! त्या स्वर्गलोकींच्या — खुलव सौंदर्यबागांना ।।
हुतात्मे स्वर्गिचे कोणी — भग्नहृदया कुणी तरुणी
निराशेनें जरी जळती — शांतवी तूं तया गानीं ।।
कुणी घेती उडी खाली — प्रेमसंन्यास साधाया
तूंच गा देउनी झोके — तयांच्या भंगल्या हृदयां ।।
लाजली ती पहा तारा — इंदु येतां तिच्या जवळीं
धीर द्याया जरा तिजला — "गाच कविते गडे कांहीं"

**—शंकर बाळाजी नेरकर,** बी. ए.



4630

# महदन्तर--

[ शा. वि ]

— १ —

माझ्या वाणितुनी कठोर जळती विद्युल्लता कोसळे ।
नेत्रांतूनि तुझ्या दयामृतमयी कादम्बिनी ओघळे ॥
माझ्या वागणुकींत घोर उठती रात्रंदिनीं वादळें ।
त्यायोगें झडती समूल हसरीं त्वद्‌भावनांचीं फुलें ॥

— २ —

मी गम्भीर कधीं, कधीं कुपित वा आनंदलेला कधीं ।
होईना अणुमात्र पालट तुझ्या कारुण्यवृत्तीमधीं ॥
मी माझाच अनेकवार करितों धिक्कार संतापुनी ।
जाशी तूं शुभचिन्तनीय वचनें माझ्या शिरीं ओपुनी ॥

— ३ —

मी सामान्य असे–विकार नसती आधीन माझ्या जरा ।
जात्या त्यावरतीं दिसें तव असे स्वामित्व लोकोत्तरा ॥
घेती जन्म तुझ्या अगाध हृदयीं शांति, क्षमा अन् दया ।
देवाची करुं कल्पना न मग कां मी हीन ठायीं तुझ्या ॥

—भवानी शंकर श्री. पंडित, एम्. ए.

---

# मालन--

[ इवला झरा ऽऽ गायन गात ऽऽ ]

इवला झरा गायन गात
चांदण्यासवें हांसली रात
हालेना जरा वेलीचें पान
निजली धरा निजलें रान
आई बहिणी झोपल्या घरीं
येग येग ये मागल्या दारीं
माथ्यावरतीं हांसे चंदिर
सांग मी कसा धरावा धीर
भागले डोळे वाट पाहून
प्रीतीची माझी ये ग मालन

पुष्पावरती दंवाचे बिंदू
अंतराळांत फिरावा इंदू
पानोपानीं कीं नाजूक वारा
झीमझीम कीं जलद धारा
तशीच येते मूकमोहन
अंगणांतल्या वल्लरींतून
शरदाची कीं, ढवळी रात
हांसली प्रीत आंतल्याआंत
दाविते कोण हंसीची मान
हासून येते माझी मालन

पाहुन तुझे काजळी डोळे
माझें ग मन भुललें भोळें
कपाळावरी चांदणी कोर
पाठीवरती केसांचा भार
हांसणें गोड लावण्यखाणी
कंठातून ये कोकीळावाणी
फुलांचे हार शोभले गळां
रानराणीचा श्रुंगार भोळा
कोणाचें ध्यान, कोणाचें गान ?
प्रीतीची कोण सांग मालन ?

एकाएकी का थांबली अशी ?
संध्येची दूर चांदणी जशी
मूर्तीच जशी हालेचालेना
उभी का दूर अधोवदना ?
कंपन ओठीं लाज नयनीं
बावरूं नको रानहरिणी
काय अंतरीं भीती सारखी
नको ग परी होऊं पारखी
प्रीतीला नाहीं भीतीचें भान
प्रीतीची माझी देवी मालन

एकमेकांच्या आलिंगनांत
भावनामय चुंबनगीत
एकामेकांच्या नयनांवरी
प्रीतमोहना दिसे नाचरी
एकामेकांची ऐकावी तरी--
हृदयवीणा झङ्कार करी
इवला झरा गायन गात
चांदण्यासवें हांसली रात
हाललें जरा वेलीचें पान
हांसली धरा, हांसलें रान

**ना. घ. देशपांडे**, बी. ए.



# पुष्पगुच्छ

( जाति—फुलवेल )

फुल्ल फुलांचा प्रफुल्ल साचा
नयनमनोहर गुच्छ तयांचा
गोधुनि वसनीं मधुर दलांच्या
रमण सुवासीं
झालें मन सुमननिवासी

—२—

सुवर्ण पात्रीं सु—वर्ण ज्यातें
वर्णन करतां वैखरि थकते
कोरिव नक्षी भुलवि मनातें
ठेविला दिसतां
गुच्छ तो शिकवितो चित्ता

—३—

नानारंगी विविध तऱ्हांनीं
पुष्पें सारी विमल निवडुनी
गंधयुक्त त्या मधुनि वेंचुनि
करितां एक
शोभतो तदाची स्तबक

—४—

भिन्न मतांचे जगांत पुढारी
राष्ट्रासाठीं झटती भारी

देशोन्नतिची करुनि तयारी
परोपरीऽनें
झटतात विविध पंथानें

—९—

भिन्न कांतिच्या ह्या सुमनांचा
सुवास ज्यांना अमल कीर्तिचा
समाजकदलीं बंधनिं साचा
भाव गुच्छाचा
संदेश दिव्य एकीचा

**अनंत ओक**



स्थळ प्रत
सं. .......... नं. ..........
ता. ..........
९. ठाणें.

# ताज--

" There they lie the loving-hearted
Neath its marble side by side,
Those in life so long-life-parted
Death no longer can divide."

[ चाल—तेजस्वीता तव—— ]

मोहकता ही तव बघुनी
वाटे सौंदर्याची जगतीं एकच एक खनी ॥
दूरचि शहरापासोनी
कृष्णजीवना यमभगिनी
कालिंदीतटिं बैसोनी
मानव हृदया रंजविण्याला अवतरला भुवनीं ॥
यमुना जल दर्पण करुनी
निजरुपडें त्यामधि बघुनी
आनन्दानें मन भरुनी
जनहृत्पटलीं स्मरवुनि देतो निज जनिताजननी ॥
योग्य खचित वर मानोनी
तोषित होई दिवसमणी
स्वसुता तुज दे अर्पोनी
बागडण्याला जन्मवरी जणुं, जोडी ये खुलुनी ॥
अ[illegible]रचना पाहोनी
विचारसागर खळबळुनी

उठती तर्कांच्या ऊर्मी
चित्रांमधलें स्थैर्य शरीरीं ये तेव्हां दिसुनी ।।
सृष्टीला यम ने सदनीं
स्पर्शी ना तो नरकरणी
यश राही धरुनी धरणी
निःसिम प्रेमाचाच मासला जगतीं ही करणी ।।

--ज्ञानेश्वर साधु.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०९२
ठाणे.



मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १०९६
ता. २-७-५३
ठाणें.

# तिचे अलंकार

कविः—" अहाऽरे केवढा आला बघाना राग वेडीला
मुखीं अनुराग विस्मय तो खुले श्रृंगार जोडीला
हवी ना माळ मोत्यांची, हवा ना अंजिरी शालू ?
जिवाच्या रातराणीला हिऱ्यांचे दागिने घालूं !

मनाच्या मुग्ध भावांचे विलासांचे अलंकार
विजेचा रम्य कांटेरी करूं या साज श्रृंगार !
हसाया मूक कलिकांची तुझ्या वेणींत फुलवेणी
मुक्यानें मूक कलिकेची करूं या बोलती वाणी

सुखाची मौक्तिकें शोधूं बुडोनी प्रेमसिंधूंत
तुला वाहीन गुंफोनी गडे या भावसूत्रांत
मऊशा स्निग्ध केसांचा भराया भांग मोत्यांनीं
नव्या भेटींत झालेल्या सुखाच्या गोड अश्रूंनीं

खुडोनी आणिले तारे कराया चांदणी चोळी
बिजेची कोर भाग्याची रमाया चंद्रिके भाळीं
कराया साथ कंठाची हवी ना कंकणें हातीं?
नव्या नवतीस नटवाया तुला घालील जलवंती

मृदुस्पर्शें विहंगाच्या मिळोनी मधुर कूजन तें
जलीं होतील जीं वलयें तया आणीन मी शांते
परागांचीच फुलवंती फुलांच्या चौफुली नाकीं
कळी ती सोनचाफ्याची अहो हांसून ही घ्या की!

जिवाला चाळवायाते तुला घे चाळ चंदेरी
सुवर्णाची सु–वर्णाला प्रभेची माळ सोनेरी

*          *          *

कवि पत्नी:—तुम्ही आणाल जिंकोनी तशी लंका सुवर्णाची
नको ती, सोय लावूं मी कशी ही भातवरणाची ?

—राजा बढे.

# चित्रलेखा

[ चाल:—अजि अक्रुर हा ]

चल उचल तुझीं अचल लोचनें वरतीं
तत्प्रभा फाकुं दे पुरती
कर मजवरती केन्द्रित अवघीं किरणें
मम चित्र काढ मग करुणें !
उमटेल पहा ! मूर्ति हुबेहुब अगदी
कां मीच शिरूं त्या आधीं ?
पापण्याआड राहीन
आसवांवरी पोहीन
तव अन्तरङ्ग पाहीन
जर ओढाया बघेल कुणि मज तिथुनी
तर आंत दडव कवळोनी !

—भवानीशंकर श्री. पंडित

# तिचे अलंकार

कवि:—" अहाऽरे केवढा आला बघाना राग वेडीला
मुखीं अनुराग विस्मय तो खुले श्रृंगार जोडीला
हवी ना माळ मोत्यांची, हवा ना अंजिरी शालू ?
जिवाच्या रातराणीला हिऱ्यांचे दागिने घालूं !

मनाच्या मुग्ध भावांचे विलासांचे अलंकार
विजेचा रम्य कांटेरी करूं या साज श्रृंगार !

हसाया मूक कलिकांची तुझ्या वेणींत फुलवेणी
मुक्यानें मूक कलिकेची करूं या बोलती वाणी

सुखाची मौक्तिकें शोधूं बुडोनी प्रेमसिंधूंत
तुला वाहीन गुंफोनी गडे या भावसूत्रांत
मऊशा स्निग्ध केसांचा भराया भांग मोत्यांनीं
नव्या भेटींत झालेल्या सुखाच्या गोड अश्रूंनीं

खुडोनी आणिले तारे कराया चांदणी चोळी
बिजेची कोर भाग्याची रमाया चंद्रिके भालीं

कराया साथ कंठाची हवी ना कंकणें हातीं?
नव्या नवतीस नटवाया तुला घालील जलवंती

मृदुस्पर्शें विहंगाच्या मिळोनी मधुर कूजन तें
जलीं होतील जीं वलयें तया आणीन मी शांतें
परागांचीच फुलवंती फुलांच्या चौफुली नाकीं
कळी ती सोनचाफ्याची अहो हांसून ही घ्या कीं!

जिवाला चाळवायाते तुला घे चाळ चंदेरी
सुवर्णाची सु-वर्णाला प्रभेची माळ सोनेरी

*　　*　　*

कवि पत्नी:--तुम्ही आणाल जिंकोनी तशी लंका सुवर्णाची
नको ती, सोय लावूं मी कशी ही भातवरणाची ?

--राजा बढे.

# चित्रलेखा

[ चाल:—आजि अक्रुर हा ]

चल उचल तुझीं अचल लोचनें वरतीं
तत्प्रभा फाकुं दे पुरती
कर मजवरती केन्द्रित अवघीं किरणें
मम चित्र काढ मग करुणें !
उमटेल पहा ! मूर्ति हुबेहुब अगदी
कां मीच शिरूं त्या आधीं ?
पापण्याआड राहीन
आसवांवरी पोहीन
तव अन्तरङग पाहीन
जर ओढाया बघेल कुणि मज तिथुनी
तर आंत दडव कवळोनी !

—भवानीशंकर श्री. पंडित

# मी सहज बोलतो--

मी सहज बोललों रुसवा धरिला तुवां
मन्मना जाहलें दुःख किती तेधवां !
तव गोरेमोरें झालें हंसरें मुख
हरपलें क्षणांतरि हृदयांतरिचें सुख

मम शब्द विषारी मन न विषारी परी
कां विषाद धरिला ? राहिल तो कुठवरी ?
कटु वचें तुझें मन नकळत मी दुखविलें
जाणीव ही मना असंख्य पाडी घरें

मी संध्या येतां वाट तुझी पाहतों
तव मनोमूर्तिला अश्रु–फुलें वाहतों
हो काळे काळे विश्व तेविं मन्मन
करि नाश तमाचा मम गेहीं येउन

मी मनीं झुरतसे एकांतीं जेधवां
हें पापक्षालन व्हायाचें केधवां ?
देशील केधवां येउन आलिंगन ?
केधवां तुझें स्मित पाहिन अश्रूंतुन ?

—गो. रा. दोडके

# अनन्य भाव

[ रागः—कालिंगडा ]

आधार सखचा ! तूं एक जिवा
तव चरणीं रत जीवन ठेवा !
तव प्रीतीचें पीयुष प्राशुनि
मत्प्रीती अजरामर होउनि
कास धरी रतली त्वच्चरणीं
अवहेलुं नको जीवन–जीवा !
तूं उदारधी–मी निर्झरणी
तेजगोल तूं–मी नीलमणी
तेजरवी तूं–मी शशिराणी
मज प्रकाश लाभे तुझ्यांत वा !
शब्द मधुर तव–मज नवजीवन
स्निग्ध दृष्टि तव मज संजीवन
थरथरते रोमारोमांतुन
हा जीव बावरे कां हळवा !
दारीं बसलें तुझ्याच येउन
प्रीति भीक दे–मीच भिकारिण
लावी अथवा मज धुडकावुन
तूं–तूंच एक आधार जिवा !
तव चरणीं रत जीवन ठेवा !!

ना. बा. शास्त्री.

# लपंडाव

[ झिम्मा खेळूं ये ]

वृक्ष डोलतो वरी चंद्र हांसतो
पारिजातकाचीं फुलें
विखुरलीं चोंहीकडे
वेचायातें जणू त्यांना वात वाहतो--॥ १ ॥
चांदण्याच्या प्रकाशांत
घालुनियां गळां हात
'साऱ्या जणी याग इथें' कोण बोलतो--॥ २ ॥
सुरूं झाला लपंडाव
चंद्रावरी आला डाव
हुडकून धरायातें त्यांना धांवतो--॥ ३ ॥
ढगाआड लपावया
'तारकांनो याग याया'
एकमेकां खुणवीता हंशा पिकतो--॥ ४ ॥
चला खेळूं शिवाशिवी
वृन्दावन करूं डावी
जमलेल्या तारकांचा पुंज नाचतो--॥ ५ ॥
चला गडे फुलें वेचूं
हव्या तशा खेळूं नाचूं
फुलामुलांचा हा मेळा छान शोभतो--॥ ६ ॥

—कु. कमल वढे

# ये ना ! राग तुझा हा पुरे !

[ केशव करणी ]

हृदयपटावर तिमिर पसरला सूर्य क्षणीं लोपला
विधूही पुरता मंदावला
मनोद्यानिच्या प्रफुल्ल पुष्पा तेजानें दाहिलें
तमानें तारांना भक्षिलें
मम सरित्तरंगा अग्नीनें जाळिलें
मम प्रकाशसूर्या दैत्यानें ग्रासिलें
मम चित्तविहंगा व्याधानें पीडिलें
दुःख विचारें भरुनी जाई, हृदय कसें बावरें
ये ना ! राग तुझा हा पुरे
मातृविहिन मी दीन जाहलो, माते तुजविण कसे
झालें मन हें वेडें पिसें
दुर्दैवाच्या गाढ तिमिरमय अफाट-भव-सागरीं
टाकुनी जाउं नको सत्वरी
मी हताश झालों तुजविण आतांपरी
हा हन्त भटकतों तिमिरकंटकांतरीं
तूं उदारहृदयें दया मजवरी करी
मातृहृदय तें पुरतें माझें ठाउक मजला वरें
ये ना-राग तुझा हा पुरे
अशनाविण कीं वसनाविण तूं जाशि अम्हां टाकुनी
नकोगे जाउं नको त्रासुनी

सुरेंद्रनगरीं सुंदर ललना, षड्रसयुत भोजनें
किंवा खुशालचेंडू जिणें
हें नको नको गे पुरते माझे मला
जरि मिळेल भाकर कांदा अन् तोंडिला
तरि असो माउली जीर्ण झोपडी मला
परि मायेची पाखर ल्याया झालें मन हांवरें
ये ना ! राग तुझा हा पुरे ॥ ३ ॥

—वि. वा. करबेळकर

---

# कसें होईल

जातांना पथि तोंडओळख जरा
झाली तुझ्याशीं कुठें
तों तूं रोखियलें बळें भिवइचें
माझ्यावरी कामठें
आतांपासुन एवढी जर तुझी
झाली तयारी गडे
होतां ओळख दाटशी तर कसें
होईल माझें पुढें ?

—भ. श्री. पंडित

# गूढ गायन

[ वृत्तः—गीतिका ]

मृदु मुग्ध शीतल शान्तता जगतावरी सुखदायिनी
मज ऐकवी श्रुतिसुन्दरा मधु रागिणी अनुरागिणी

सदनाङ्गणीं बसली अशी कमनीय कांचनवर्ण तूं
हिमगौर नाचत येतसे तुझियापरी मधुयामिनी

विमलोज्वला गतिचंचला सुमकोमला सुकुमार तूं
बघ ही तुझ्यापरि भासते लव हांसते नभचान्दणी

धरुनी सतार विलासिनी करिशी मनोहर वादना
जलतार सुन्दर वाजवी बघ शामसुन्दर वाहिनी

हिमशुभ्र अम्बर नेसुनी करुनी अधोमुख लोचनें
तुजसारखी शशिसङ्गती बसली अचंचल मेदिनी

चढतां शशाङ्क नभावरी लतिकेवरी हंसलीं फुलें
किति लाजते तुझियापरी बघ लाजरी सुमशालिनी

हृदयान्तरीं तर गीतिका पण नाचते वर शान्तता
कधिं गूढ गायन आंतलें कळणार सुन्दर साजणी

**ना. घ. देशपांडे**, बी. ए.

# जाऽ भेल्ले !

( भूपती खरे तें )

सौभाग्य कांक्षिणी 'कांता' मधुरा गमती
चिडविती मैत्रिणी खुणवुनि तिजला हंसती
' किति अलंकार ते चंद्रहार सोनेरी '
कंकणे पाटल्या शालू नव जर्तारी
मग मुळीं कुणाशीं बोलणार पण् नाहीं
येईल अम्हाला मान नि फण्काराही
हसवेल कोण ग गालीं । बाइला
फुलवेल वेल फ़लमाळी । जाइला
मग वेळ कुठे ग बाई । ताइला
'लाडके' ह्मणोनी कुणितरि मारिल हांक
अन् कुजबुज, मधु गुंजारव, धडधड, धाक
किति टिचक्या हसतिल कोमळ गालावरतीं
येईल आणखी कशा कशाला भरती ?
कशि हसशिल म्हणता राणी । प्रेमला ?
सांगता म्हणाया गाणीं । मंजुला
हितगूज ऐकतां कानीं । कोमला
अन् किंचित् वळतां ओठ,—स्पर्श जरि नुसता
कशि चट्कन् नेशिल मान दूर मृदु हसता
'लचकेल मान अं हळू' तुला बोलाया
स्फुरतील कुणाचे ओठ कांपतां काया

बंगला बाग रिझवाया । भोवतीं
संगीत वाद्य रमवाया । ती किती
मोटार रम्य फिरवाया । सोबती
अन् जवळच स्वारी,–गोड विजेचा झट्का
करशील कसा मग लपंडाव हा लटका
जंव धूर मुखावर सोडिल घेउनि झुरका
बघशील कशी ग गोड मारुनी मुरका
'किति चहाटळ मेल्ये खंड न तव बोलाला'?
"अगबाइ पहा तर राग केवढा आला"!!

—बंभर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ठाणे.
ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क. 8836
ग्रं. २१

# जा ऽ मेलं !

## ( भूपती खरे तें )

सौभाग्य कांक्षिणी 'कांता' मधुरा गमती
चिडविती मैत्रिणी खुणवुनि तिजला हंसती
'किति अलंकार ते चंद्रहार सोनेरी'
कंकणे पाटल्या शालू नव जर्तारी
मग मुळीं कुणाशीं बोलणार पण् नाहीं
येईल अम्हाला मान नि फणकाराही
हसवेल कोण ग गालीं । बाइला
फुलवेल वेल फलमाळी । जाइला
मग वेळ कुठे ग बाई । ताइला
'लाडके' ह्मणोनी कुणितरि मारिल हांक
अन् कुजबुज, मधु गुंजारव, धडधड, धाक
किति टिचक्या हसतिल कोमल गालावरतीं
येईल आणखी कशा कशाला भरती ?
कशि हसशिल म्हणता राणी । प्रेमला ?
सांगता म्हणाया गाणीं । मंजुला
हितगूज ऐकतां कानीं । कोमला
अन् किंचित् वळतां ओठ,—स्पर्श जरि नुसता
कशि चट्कन् नेशिल मान दूर मृदु हसता
'लचकेल मान अं हळू' तुला बोलाया
स्फुरतील कुणाचे ओठ कांपतां काया

बंगला बाग रिझवाया । भोवतीं
संगीत वाद्य रमवाया । ती किती
मोटार रम्य फिरवाया । सोबती
अन् जवळच स्वारी,–गोड विजेचा झट्का
करशील कसा मग लपंडाव हा लटका
जंव धूर मुखावर सोडिल घेउनि झुरका
बघशील कशी ग गोड मारुनी मुरका
‘ किति चहाटळ मेल्ये खंड न तव बोलाला ’?
“ अगवाइ पहा तर राग केवढा आला ” ! !

—बंभर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ....... नं. .......
ता. .......
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 8836
ग्रंथ २१

# दूर दूर कोठें तरी...... !

दूर दूर कोठें तरी
भेट आपुली जाहली
स्मृति अन्तरीं राहिली !
काल कितीक लोटला
हृदयींचा तूं हलेना
कोठवरी साहूं दैना !
तूझ्या दर्शनाची आस
हृदयाशीं बाळगून
बैसे जीव मी धरून
मना लागे हूरहूर
अंतरात्मा व्याकूळला
हाय कंठही सोकला
वारा कोनाकोनांतून
कैसा वाहतो भरारा
कोठें परि तूं उदारा
मारूं कोठवरी हाका
ऊर येई रे भरून
नयनांत ओसरून !
दाट मातला काळोख
त्यांत जाणार विरून
हाय मीही तूझ्याविण !
दूर दूर ग्रहगोल
एकमेकां का भेटती
वृथा आकाशीं भ्रमती !

—ना० बा० शास्त्री

# पाळत

( चालः—वीरशिरोमणी )

हालचालिवर माझ्या बारिक
देखरेख राखिसी
कोणता वहिम तुझ्या मानसीं ?
होय चूर कामांत मी—मला
भान न कांहीं उरे
रोखिसी चोर नजर कां बरें ?
जाय दूर बाहेर मी तईं
गैरहजेरित फुका
खोदुनी करिसि पूसपास कां ?
दिनरात अशी तव पाळत माझ्यावर
पाहुनिया माझें काळिज हो कातर
भलभलतें उठतें माथ्यामधिं काहुर
काय होय जाणुनी नेणुनी
चूकभूल ना कळे
आंतल्या आंतच मी तळमळे

—भ. श्री. पंडित

# कलहान्तरिता

[ जाति–प्रणयप्रभा ]

कां गडे तयांवर रुस्लिस् ग ?
नांव घेतांच खुद्कन् हस्लिस् ग !
येतां सदनीं कलिका हसली
मुळि न लबाडे मान वळविली
उगाच लटकी रुसून बसली
अन् हळूंच काय तरि म्हणलिस् ग ?
अनुनय अभिनय सुंदरता ती
वळ्या तीन त्या भालावरतीं
रंग उषेचा गालावरतीं
फडकतांच कां मग खुललिस ग ?
" कुठवर राहिल अतां अबोला !
या हं सोडा; राग निवाला
रमुं या झुलवुनि हा हिंदोला "
मधु बोलाला खुळे कशि फस्लिस् ग ?
जाता प्रियकर कुठें दूरवर
कां होशी भेटण्यास आतुर !
विरहताप साहतेस खडतर
अशि कशी सुमन क्षणिं सुकलिस् ग ?
बघतां डोकाउन दारांतुन
दृष्टिस दिसला मुरली मोहन
किंचित् ढळला पदर सांवरुन

लगबगा घरामधि शिरलिस् ग !

कळलें तुजला, दार वाजलें
स्तब्ध तरी तूं, नयन झांकले
मधुसंवेदन नाद विखुरले
थर्थरुन् कशी बाइ हललिस् ग !
कधि ग ? कोणी ? भलतं कांहीं
चावट कुठली हाडच नाहीं
पुरे पुरे अं, वेडाबाई !
आतां एकाकि विमले विरलिस् ग !

—राजा बढे



# शीळ

रानारानांत गेली बाई शीळ!
रानारानांत गेली बाई शीळ!!

राया तुला रे काळ येळ नाहीं
राया तुला रे ताळमेळ नाहीं
थोर राया तुझे रे कुळशीळ
रानारानांत गेली बाई शीळ!

तिथं रायाचे पिकले मळे
वरी आकाश शोभे निळे
शरदाच्या ढगाची त्याला झील
रानारानांत गेली बाई शीळ!

येड्यावानी फिरे रानोराना
जसा कांहीं ग मोहन कान्हा
माझ्या रायाच्या गालीचा ग तीळ
रानारानांत गेली बाई शीळ!

गेले धाऊन सोडून सुगी
दुरी राहून राहिली उगी
हांसे जसा ग राम घननीळ
रानारानांत गेली बाई शीळ!

वाहे झरा ग झुळझुळ वाणी
तिथें वाऱ्याची गोड गोड गाणीं
तिथें राया उभारे असशील
रानारानांत गेली बाई शीळ!

रानीं राया ग हा फुलावाणी
रानी खुलेन मी फुलराणी
बाई सुवास रानीं भरतील
रानारानांत गेली बाई शीळ!

फिरूं गळ्यांत घालुन गळा
मग घुमव मोहन शिळा
रानीं कोकीळ सूर धरतील
रानारानांत गेली बाई शीळ!

—ना. घ. देशपाण्डे, बी. ए.

# शीळ

रानारानांत गेली बाई शीळ!
रानारानांत गेली बाई शीळ !!

राया तुला रे काळ वेळ नाहीं
राया तुला रे ताळमेळ नाहीं
थोर राया तुझें रे कुळशीळ
रानारानांत गेली बाई शीळ!

तिथं रायाचे पिकले मळे
वरी आकाश शोभे निळें
शरदाच्या ढगाची त्याला झील
रानारानांत गेली बाई शीळ!

येड्यावाणी फिरे रानोराना
जसा कांहीं ग मोहन कान्हा
माझ्या रायाच्या गालीचा ग तीळ
रानारानांत गेली बाई शीळ!

गेले धाऊन सोडून सुगी
दुरी राहून राहिली उगी
हांसे जसा ग राम घननीळ
रानारानांत गेली बाई शीळ!

वाहे झरा ग झुळझुळ वाणी
तिथें वाऱ्याची गोड गोड गाणीं
तिथें राया उभारे असशील
रानारानांत गेली बाई शीळ!

रानीं राया ग हा फुलावाणी
रानी खुलेन मी फुलराणी
बाई सुवास रानीं भरतील
रानारानांत गेली बाई शीळ!

फिरूं गळ्यांत घालुन गळा
मग घुमव मोहन शिळा
रानीं कोकीळसूर धरतील
रानारानांत गेली बाई शीळ!

—ना. घ. देशपाण्डे, बी. ए.

---

# तपश्चर्या

( हात धुवून पाठीस लागणारा एखादा प्रेमीवीर सांपडला तर त्याची प्रदीर्घ तपश्चर्या सिद्धीला जाईल यांत संशयच नाहीं. कवि यशवंत यांच्या सुंदर कवितेची टिंगल करण्याइतका मी अरसिक नाहीं ही गोष्ट वाचक विसरणार नाहींत अशी आशा आहे )

" तूं गेलीस समोरुनी मममनीं झालें कसेंसेचसे "
स्त्रीरूपें जणु गोड पुष्प फुललें भासे मना राजसे
तेव्हां पासुन कोरली स्वहृदयीं मूर्ती मनोहारिणी
प्रेमें मानस पूजनीं निशिदिनीं लागे तुझी ओढणी

" तूं गेलीस समोरुनी मममनीं झालें कसेंसेचसे "
'**काळी पोत**' गळयांत पाहुनि तुझ्या, धक्का मनाला बसे
आशा–ताजमहाल जो उभविला मी कल्पना–वैभवें
तो नेती नयनासवें झडकरी वाहूनि ओघासवें

" तूं गेलीस समोरुनी मम मनीं झालें कसेंसेचसें "
हा! सौभाग्यसुचिन्ह **कुंकुमटिळा भालीं न आतां दिसे**
दैवें पायदळीं चुकून पडल्या पुष्पांस ह्या पाहुन
आशेची उजळे उषा मम मनीं नैराश्य रात्रींतुन

तूं गेलीस समोरुनी न कळतां डोळे तुझे झांकुन
'आतां ओळख ना!' हळूंच म्हटलें ' घे नांव ना हांसुन '

—**अनंत ओक**

# चालूं वाट कशी ?

मृत आशांची हातीं माती
मम हृदयीची मेली स्फूर्ती
तिमिर माजला सारा भंवतीं
चालूं वाट कशी ?

मुलुख दयाळा ! परका सारा
जलद व्यापिती अखिल अम्बरा
नेला फसवुनि मम धृवतारा !
चालूं वाट कशी ?

दुर्दैवाचा वारा सुटला
तुफान सागर पहा खवळला
मम तारूवर घाली घाला !
चालूं वाट कशी ?

ठायीं ठायीं निबिड हिमानी
गिळावया बघ आ वासोनी
देवा ! दुबळी माझी तरणी !
चालूं वाट कशी ?

—दिनकर मुलकलवार.

# " सौन्दर्य देवतेस- "

( सुमंदारमाला )

किती तारका, गोल तेजाळ ते जन्मले दोन त्वन्नेत्रनीलांबरीं
तुझ्या भ्रूवरी इंद्रचाप–द्वय स्वेदबिंदूंतुनी रंगले सुंदरी !
किती रूप लावण्य ! सौन्दर्यदेवीच तूं मूर्तरूपीं दिसे भूवरी
तुझें मांडिलें ध्यान नेत्रांतुनी तेजधारा कृपेच्या स्त्रवूं दे तरी

२

तुझ्या रोमरोमांतुनी मन्मथ प्रेम–गीतांस निश्वासुनी गातसे
सुधायुक्त वाणी वसंतास आणी सदा प्रीतिमोहोर गे राजसे
तुझ्या मंजु हास्यांतुनी चंद्र घे चांदणें चोरुनी चोरुनी तो किती
तृणांतूनि तूं चालसी वाळल्या तों गुलाबी तिथें ताटवे हांसती

३

तुझें चालणें मंद तालावरी तें हृदा माझिया नाचवी डोलवी
पुन्हां खुंटल्या प्रेमवेलीस माझ्या फुलें आणशी गोडशीं तूं नवीं
तुझें रूप स्फूर्तीच मत्संगिताला; कलांनाहि चैतन्य तूं अर्पिशी
तुझे बोल तें काव्य उच्छिष्ट माझें नको जाउं दृष्टींतुनी गे दुरी

—शं. बा. नेरकर.



# परित्यक्ता

## ( जाति—शूर्पणखा )

हें नको नको वांचणें !
कशाला जीवन जगिं कंठणें! ॥ धृ ॥
ही अवनी कंटक–युता
भासते मला तत्वतां
जीवा न मिळे शांतता
गरिबास किती जांचणें!
कशाला जीवन जगिं कंठणें! ॥
त्या नणन्द भाऊजया
टोंचती जिवा कासया
जळजळीत बोलूनिया
मग किती बरें सोसणें!
कशाला जीवन जगिं कंठणें! ॥
ती सवतीची जांचणी
सोसते ग रात्रंदिनीं
परि कठिण हृदय मानिनी
मुळीं तें सोडीना भाजणें !
कशाला जीवन जगिं कंठणें ! ॥
ती सासू प्रेमळ परी (?)
बोलतां वार हो उरीं
सोन्याची गमतें सुरी

मी हृदयिं नित्य ठेवणें !
कशाला जीवन जगिं कंटणें ! ।।
पति माझे सालस किती (?)
परि हळूं हळूं संप्रती
मज निष्कारण गांजिती ! ।।
मग काय तया बोलणें ?
कशाला जीवन जगिं कंठणें ! ।।
या असार भवसागरीं
उसळली निराश्रित तरी
वांचवाच कोणी तरी !
भरंवसा कुणा सांगणें ?
कशाला जीवन जगिं कंठणें ! ।।

—वि. वा. करंबेळकर



# अरुण

( कवि केशव कुमारांच्या भयंकर अरुणांत कांहीं कल्पना राहिल्याशा वाटून ह्या मी सुचवीत आहे. श्री. केशवकुमार आपले-पणानें यांचा स्वीकार करतील अशी आशा आहे. --केशव.)

[ जाति—चंद्रकांत ]

अग्निरथातें थांबविण्या कां हा 'पोर्टर' आला !
हलवित करिच्या वाऱ्यावरती लाल निशाणाला
नभःपथाची करिति 'रिपेरी' अथवा दिग्पाल
मिणमिण जळती कंदिल अजुनी रात्रीचे लाल
'शान' म्हणोनी प्रातःकाळीं करितां क्षुरकर्म
हाय! काय तें रक्त निघालें 'रेझर' लागून
लाल शेंदरी नेसुनि कोणी वृद्धा स्वर्गींची
लगबग चाले श्वान गतीनें वाट पुराणाची
बांधुनि डोईला मुंडासे नव लफ्फेदार
'व्होट' द्यावया कुणी चालला वऱ्हाडचा वीर
'तिच्या' पिन्वरी उभे राहतां कवटाळुनि दंड
भार न द्दोउनि सहन जाहलें लाल तिचें तोंड
पिकदाणि उलटलीच किंवा इंद्राच्या घरची
भरली वाटे निळी रुपेरी सत्रंजी तळची
तुंदिल तनु बैसला वाटतें जेवाया खास
पानावरती खूप वाढली जिलब्यांची रास

लाल पातळें नेसुनि जमल्या काय मनोहारी
मैदानावर छत्तिसगडच्या प्रौढ, नव्या, नारी
करी कुणी का हकीम अपुली लांब शुभ्र दाढी
लाउनि रातीं लाल भडक ती रंगली मेंदी
मौज म्हणुनि कां परमेशानें चमत्कार केला
प्रदीप्त ज्वालामुखी तयानें उलटा बैसविला
हूरासंगें लपंडाव खेळतो महंमद कीं
अस्मानी फिरतांना दिसते ही टोपी तुर्की
पितरांनीं पुत्रांना पत्रें पाठविण्यासाठीं
परलोकावर काय टांगली पत्राची पेटी
असे आणखी कितीक येतिल दाखवितां अरुण
परस्परांचें चुंबन घेतां नव तरुणी तरुण

—केशव



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ............
ठाणें.

# कल्लोलिनी

[ विलापिका ]

[ कवि--राजा बढे ]

(प्राणाहुन प्रिय अशी पायचाकी हंबर कन्या सौ. 'कल्लोलिनी' चोरीस गेल्यावर.)

[ जातिः—शूर्पणखा ]

हा काळा रागाउनी कशी रे नेलिस मम स्वामिनी !
जी प्रिय मज प्राणाहुनी प्रियतमा, पायचाकि ही जुनी
जग सर्व मला हें सुने
मनमोहिनि ग तुजविणें
अति कटुतर तापद जिणें कसे ग साहिन सहगामिनी ?
पंकपाळ खलखल हले
किति खिळे तले निखळले
तव कंठ तेधवां खुले किती ग कोमल कल्लोलिनी !
किति खांच नि खळग्यांतुनी
जातांना मार्गांतुनी
खड खडा तान छेडुनी रिझविसी मनास मंदाकिनी
दर दिवशीं तुज मी पुसे
तूं क्षणांत गालीं हसे
मार्गांत परी गे रुसे तधीं तू भासलि मज वैरिणी
निर्बंध तुला ना हवा
मोकळी मिळावी हवा

भोगण्यास या वैभवा  हांवरी  हौस हुरळते मनीं
ती मितभाषिणि घंटिका
रुसुनिया बैसली फुका
जन-मन-श्रवण वेधिका  कशी ग  संकटिं मज पाडुनी
लोळलों कितिकदां गडे
मार्गांत बोचले खडे
वेडे परि मन बापुडे  कधीं ना  देइल तुज टाकुनी
सावध मी नसतां कदा
किति मुरके घेशी तदा
आणिशी तशा आपदा  कुणाला  उगाच कवटाळुनी
वांकडी तुझी पाउलें
प्रति सतीच परि मानिलें
तव गुणास वाखाणिलें  किती ग  मनांत मायाविनी
तव प्राणवायु संपतां
पायींच चाललों तदा
शिणविले न तव मृदुपदा  सखेग  सदैव गजगामिनी
नवकज्जलमुखकंजतें
तिमिरांतहि गे चमकतें
संमोह मना लाविते  तुझी ती  प्रतिमा सद्‌गुणखनी
वेदना तुझ्या मज कळे
जीव हा बहू कळवळे
आस ही तशी मावळे  कुठेही  जाण्याची मानिनी
इच्छीत स्थळीं पोंचण्या
लागती जरी टोंचण्या

कुर्कूर तुझी ऐकण्या तरी गे सदैव तत्पर मनीं
कचकडी कंकणें तशी
कितिकदां कले! फोडिशी
मी निर्धन तुज रोजची कुठोनी घालिन सौदामिनी
माहेर तुला विसरलें
हुंबरशी तरि कां खुळे ?
तव प्राण मजसि बांधिलें तुला मी तूंहि मला गे जनीं
पदचाकी स्वर्गातली
कीं इंद्राची हरविली
म्हणुनिया तुला उडविली बघोनी सन्निध नसतां कुणी
तुज अतां कुठें पाहिन ?
चिरविरह कसा साहिन ?
तरि एकनिष्ठ राहिन कधीं ना करीन दुसरी कुणी

—राजा बढे

कवि--के. मा. आराधे.

# एका ओसाड बागेंतील वसंत

( जाती--रसना )

ऋतुराज स्वागताला -- नटली निसर्ग-राणी
तरुवल्लरी फुलांना -- जणु चारूतेंत न्हाणी ।
गालीं फुलांफुलांनीं -- हळुवार चुंबिलेली
लल्कार कोकिलेची -- हा गंधवाह आणी ।
हंसरा वसंत हासे -- हिरव्या नवीन रानीं
लतिका तशा तरूंच्या-- एकोन एक पानीं ।
नटतां वसुंधरा ही -- ऋतुराज माधुरीनें
उद्यान तेवढें हें -- येथें वसंत नाहीं
नव पल्लवीं लतांना -- कलिका कितेक आल्या
फुलल्या न त्या परंतू -- त्यांना विकास नाहीं !
इथल्याच मोगरीला -- लवही सुगंध नाहीं ।
मुकुलीं सरोरूहांच्या-- मधुकोष रिक्त राही !
तृणकंटकाकुला ही -- सारी प्रसूनराजी
क्षतभिन्न पाकळ्यांनीं - गळली कळ्याकळ्यांनीं
हतवीर शोणितानें -- भिजली इथें धरित्री
म्हणुनी फुलूनि गेली - जणु, रक्तकिंशुकांनीं
हो भंग शांततेचा -- हलतां हळूच पानें
वा मूक षट्पदांच्या-- क्षण एक गुंजितांनीं !
अथवा कधीं पिलांची - होतां स्मृती कुणाला
त्या दीन पाखरांच्या - करुणार्त कूजितांनीं !

कुर्कूर तुझी ऐकण्या  तरी गे  सदैव तत्पर मनीं
कचकडी कंकणें तशी
कितिकदां कले ! फोडिशी
मी निर्धन तुज रोजची  कुठोनी  घालिन सौदामिनी
माहेर तुला विसरलें
हंवरशी तरि कां खुळे ?
तव प्राण मजसि बांधिलें  तुला मी  तूंहि मला गे जनीं
पदचाकी स्वर्गांतली
कीं इंद्राची हरविली
म्हणुनिया तुला उडविली  बघोनी  सन्निध नसतां कुणी
तुज अतां कुठें पाहिन ?
चिरविरह कसा साहिन ?
तरि एकनिष्ठ राहिन  कधीं ना  करीन दुसरी कुणी

—राजा बढे

कवि--के. मा. आराधे.

# एका ओसाड बागेंतील वसंत

( जाती---रसना )

ऋतुराज स्वागताला --- नटली निसर्ग-राणी
तरुवल्लरी फुलांना --- जणु चारुतेंत न्हाणी ।
गालीं फुलांफुलांनीं --- हळुवार चुंबिलेली
लल्कार कोकिलेची --- हा गंधवाह आणी ।
हंसरा वसंत हासे --- हिरव्या नवीन रानीं
लतिका तशा तरूंच्या--- एकोन एक पानीं ।
नटतां वसुंधरा ही --- ऋतुराज माधुरीनें
उद्यान तेवढें हें --- येथें वसंत नाहीं
नव पल्लवीं लतांना --- कलिका कितेक आल्या
फुलल्या न त्या परंतू --- त्यांना विकास नाहीं !
इथल्याच मोगरीला --- लवही सुगंध नाहीं ।
मुकुलीं सरोरुहांच्या--- मधुकोष रिक्त राही !
तृणकंटकाकुला ही --- सारी प्रसूनराजी
क्षतभिन्न पाकळयांनीं - गळली कळयाकळयांनीं
हतवीर शोणितानें --- भिजली इथें धरित्री
म्हणुनी फुलूनि गेली - जणुं, रक्तकिंशुकांनीं
हो भंग शांततेचा --- हलतां हळूच पानें
वा मूक षट्पदांच्या--- क्षण एक रुंजितांनीं !
अथवा कधीं पिलांची - होतां स्मृती कुणाला
त्या दीन पाखरांच्या - करुणार्त कूजितांनीं !

फुलती न कां फुलें? ना–कां शब्द कोकिलेला ?
ही वेदना कशाची –– इथल्या वसंतश्रीला ?
हसली असेल केव्हां –– ही बाग वैभवानें !
परि आज त्या स्मृतीनें– होती व्यथा मनाला!
फुलतील कां फुलें हीं–– कधि अश्रुसिंचनानें
येतील शब्द किंवा –– विनवून कोकिलेला ?

––के. मा. आराध्ये

---

# तिळगूळ !!

तिळातिळांनीं प्रीति वाढली – क्षणांत सखये आज विरे ।
प्रीतिलतेची पुष्पें खुडिलीं – अ.ज निर्दये अदय करें ।।
प्रीति सुधाकर सुधे, आपला – क्षयी शशी हा आज ठरे ।
पूर्णचंद्र चंद्रिका सेविली – काळरात्र ही अतां उरे ।।
नभांगणांतुनि निखळे तारा – पाहणार तो खास दरी ।
सख्य तसें तें सखे आपुलें – शंका तांडव हृदीं करी ।।
संक्रातीचा तिळगूळ हातीं–
अश्रू नयनीं उभे परी ।
तिलांजली ही मृतप्रेमाला–
आज अर्पिली तुवां खरी ।।

––श्रीराम

# पतित--पुष्प

"............................Their perfume lost,
Take these again; for to the noble mind. Rich gifts wax poor when givers prove unkind."

**-Shakespeare.**

[ चाल०--ऐसाचि रहा. ]

१

घ्या उचलुन घ्या। फूल गडे ॥ ::
वेळ नच करा। त्यांत प्रियकरा। :: ::
कोमेजुनि जाईल गडे ॥

२

:: ठेवियलें मी
:: :: त्वत्पादार्चनिं
पाहि जरि कुणी, दृष्ट घडे ॥

३

पूर्ण विकसुनी ::
बघें निरखुनी :: ::
कां त्या पाहुनि मुख मुरडें ?

४

:: त्वत्–हृदयावरि
:: :: ठाव न त्या जरि
स्पर्शुनिच करा, पुनित गडे ॥

५

नसो सुगंधहि ::
नसो सुवर्णहि :: ::
बळे पतंगहि वन्हिकडे ।।

६

:: करा प्रियकरा
:: :: पुढें लव करा
काळ भरभरा जाइ गडे ।।

७

जाइ विरोनी ::
विकास सुमनीं :: ::
पुनरपि निर्चनिं कधिं नुवडें ।।

—ज्ञानेश्वर साधु.



## समर्पण

जगीं जधीं मी प्रथम पातलें
त्याच क्षणीं तूं मला रोधिलें
स्वतंत्र होतें जयीं जन्मलें
कसें मला त्वां परवश केलें ! १

पसरविले त्वां प्रीती-जाला
त्यांत फसविलें मज स्नेहाळा
अद्‌भुतांतला खेळ खेळला
रवि कमलांचा मेळ जाहला ! २

शूल सले हा उरीं प्रतीक्षणि
जिवास माझ्या सदाच झुरणी
प्रणयवंचिता विकल विरहिणी
प्रीती-जाळीं विधित हरिणी ! ३

सदया हृदया ! अदय असा कां !
समीप असुनी सांग दूर कां !
पुढें उभा तूं, ना दिससी कां !
उगाच रडते मारित हांका ! ४

दृश्यें भंवतीं विमल मनोरम
मृदुल करें सारितां दूर तम
उषा-निशेचा प्रेमळ संगम
मनांत गाती प्रीत-विहंगम ! ५

नयनांश्रूंचे हार विणुनियां
शान्तवीन या व्यथीत हृदया
तुडव पदतळीं हंसुनी राया
अर्पिन तरिही तुज मन काया !

--य. वा. शास्त्री.

# " मातृभूमीस "

[ सुमंदारमाला ]

'नमो मातृभूमी' 'नमो पुण्यभूमी' करूं गर्जना केंवि ही प्रेमले
मनीं आज शोकाकुला भावनांचें कसें जाळतें रान हें माजलें
तनू पोळली पारतंत्र्यानलीं आंच लागे जिवाच्या जिवा राजसे
चिता पेटली अंतरीं मन्मनाचे पहा जाहले कोळसे कोळसे

तुझ्याही मनीं खांडवारण्य पेटें निराशा सदा जाळि हृन्मंदिरा
झरे क्षार दुःखाश्रु लक्षावधी निर्झरांतूनि जे भेटती सागरा
उमाळे तुझे मंद मंदानिलांचे इथें वाहती उष्ण निश्वासही
तनू कोमला कांचली जीर्ण झाली कशी श्रृंखलांनीं तुझी सर्वही

हिरे माणकांची सवें घेउनी रास घे स्वर्नदी झेंप दार्गीं तुझ्या
परद्वीपवासी लुटे सर्व भांडार तूं मात्र कंगाल लोकांत ह्या
कुठें तुंग झेंडा तुझा भर्जरीचा स्वदेशी मुळीं सूतही ना दिसे
यशो-दुंदुभी आज कोठें पळाली तुझा क्रोश कानीं परी येतसे

:: :: ::

वसंतोत्सवीं रम्य स्वातंत्र्य-गानीं उषा मंगला जेधवां ती खुले
करी सत्वरीं पावना गायनातें मुक्या कोकिळांचे गळे मोकळे

--शं. बा. नेरकर, बी. ए.

# कां चंद्रा ?--

कां चद्रा खिडकीमधुनी
किरण सोडिशी मम सदनीं !
वृक्षाआड स्वयें लपुनी
जा जा झडकरि येयोनी

सुंदरशा गादीवरती
बाहुलि माझी निजली ती
अंगाई म्हणुनी तिजला
झोंपविली मी या वेळां

करांगुली तिज लावोनी
उठवुं नको निद्रेमधुनी
गमेल तिज दिन उजाडला
जागी राहिल रात्रीला

झोंप पुरेशी ना मिळुनी
निजेल बघ ती उद्यां दिनीं
खेळूं मी मग कोणाशीं ?
येशिल तूं खेळायासी ?

बाहुलि माझी सुंदरशी
पाहुनिया कां रे हंसशी ?
दृष्ट तुझी तिज लागेल
लपवी सत्वर तव गोल

जा जा चंद्रा सदनाला
वेळ किती हा बघ झाला !
वळुनि वळुनि कां बघतोस ?
बाहुलि माझी घ्यायास

—रामभजनी

# हृदयिं तुझ्या जर प्रीति नसे !

( चाल–अयि मधुरे मधु मोदविलासिनि. )

( १ )

अर्ध्या उघड्या ज्यांच्या नयनांतुनि सरलीं स्वप्नें न पुरीं
कलिकांभंवतीं उषामुखीं जइं भ्रमर प्रणयगुंजना करी,
कां सखि, पर्युत्सुक झाली तूं? उगिच तुझ्या कां स्मित अधरीं?

( २ )

रवि संध्येच्या अरुण कपोलीं अधिक अरुणिमा जइं वितरी
त्या रंगीं अनुरंजित वीची तरळ हालत्या जळावरी,
सजनि, तुझ्या कां गालीं संध्या? थरथरले कां अधर तरी?

( ३ )

प्रीति समुत्सुक सजण जिवाचा लपवि, यदा तिमिरीं रजनी
व्यथित चक्रवाकीचें क्रंदन–करुण, तुझ्या येतां श्रवणीं,
सहज शोधिती नयन कुणा तव? कां सखि, खळबळ होय मनीं?

( ४ )

प्रणयगोपनें अथवा रोषें चकविशील तूं कुणा? कसें?
'भाव वेगळा, शब्द निराळे ही प्रणयाची रीति असे.'
हें संवेदन सजनि, कुणास्तव हृदयिं तुझ्या जर प्रीति नसे?

—के. मा. आराध्ये

# वर्षा

कृष्णमेघ हे गगनश्रीच्या मलूल वदनावरी
दुःख हें कसलें सांगा तरी ?
प्रफुल्लवदना नित्य सुन्दरी आज अशीं कां परी
ढाळिते दुःखाश्रूंच्या सरी !
वसुन्धरेच्या कुशीं घालुनी म्लान वदन आपुलें
वसन–नव तिचें चिंब भिजविलें !
कुंकु पुसटलें सगळें बघ हें पुरे गडे रोदन
वेडि ! तव करूं किती सांत्वन !
नक्षत्रांची माला अग !–ही तुटली तुटली बरं
हरपली रत्नें किति सुन्दर !
मोजुनि पाही अमोल रत्नें देवाघरचीं अशीं
तयातें अ–मोल का मानिशी ?
रजनी बघ ही राजस राणी रुसलीशी वाटते
बोललें कोण तिला आज तें ?
त्यांत तियेची माळ तुला जी घालायाला दिली
तोडुनी बघ तूं ती टाकिली
कृष्ण तुझ्या या चंद्रकळेवर हीं रत्नें विखुरलीं
वेंच ग हातीं जर लागलीं
हं !–गळलीं हीं सगळीं रत्नें, एक दोन राहिलीं
पुन्हां कां म्लान सखी जाहली ?
देवाघरच्या भांडारांतुनि अमोल रत्नें अशी
आणवूं तुला गडे छानशी
पुरे सखे आक्रंदन आतां, श्रांत किती जाहली
उगी अं! उगी सखी सोनुली

—कु. दमयंती थेरगांवकर

# " बा वसंतराया येथें ना सुखराशी "

हांसशी
रम्य पाहशी
गानिं गुंगशी
उताविळ होशी
बा वसंतराया येथें नां सुख राशी !

स्वर्गांत
गोड सौख्यांत
रम्य मोदांत
विहरती देव
पण अफाट दर्या येथें कलती नांव!

अनुरंग
उत्सवीं दंग
अप्सरा संग
मोहिनी घाली
प्रभुराज विसरले भू-जननीं या कालीं !
तें रामराज्य स्वर्गिचें, नां इथे !
तो वसंत उत्सव कसा ? मग इथें !
ही मातृभूमि जखडली, बघ इथें !

मधु फुलें
सृष्टिचीं मुलें
नां तया झुले

लोटण्यां आई
मग मंगल गीतें कोण तुला रे गाई ?
बेभान
करितसे जाण
कोकिळा गान
विसरली सारे
औदास्यें भरल्या बेसुर वाही वारे !
आनंद
मना स्वच्छंद
वृत्ति मग धुन्द !
कुणाची होई ?
हीं केविलवाणी दृष्यें येथिल पाहीं!
तें सौख्य रम्य येथलें, लोपलें
ऋतु वसंत असुनीं तपां, तापलें
उत्सवास जागा इथें, नां मिळे
जोंवरीं
मातृमंदिरीं
दीप नां तरीं
प्रकाशिल पाहीं
छे: कसले उत्सव, करण्याचें दिन नाहीं !

—सौ. मनोरमाबाई नावलेकर

-------

# निरोप घेतांना–

दारांआड दडून साश्रुनयनें द्याया निरोपासि तूं–
होतां सिद्ध मनांत वादळ उठें तें सांग कैसें कथूं ?
बाळाला बघुनी प्रसन्न सखये अंगावरीं गे तुझ्या
झालों आतुर चुम्बण्यास किति त्या जीवास माझ्या दुज्या ! !

आभ्राच्छादित काय मी बघतसे इन्दूकला कोमला
दारांआड तशी तुला निरखुनी हो भास कान्ते मला !
गेलें भान मदीय आणि सहजीं मी जाहलों निश्चल !
झांकोनी पण अंचलें नयन तूं झालीस ना चंचल !

एकाएकिं बघून तात, जननी, ये भान माझें मला,
संकोचें फिरवून दृष्टि सखये मी मार्ग चोखाळिला !
गेले भाव गुलाब सर्व अपुले कोमेजुनी वाळुनी–
शब्दांवीण मनांत, आणि सलती कांटे अतां जीवनीं ! !

:: :: ::

वारंवार तरी वळून सहजीं मी मागुतीं पाहतों !
होतों दीन, हताश! आणि पथि या घोंटाळतों! चालतों ! !

—ना. मा. सरपटवार.

# गरिबाचें गाणें

[ जाति—फुलवेल ]

हांव कशाला । लखलाभ जयाचें त्याला धृ ॥
माझे नशिबीं कुठले वाडे ।
नोकर चाकर गाडी घोडे ।
छान परी तें जीर्ण झोंपडें ।
माझें मजला । लखलाभ जयाचें त्याला ॥ १ ॥
तुमची दुनिया कुंदकळ्यांची ।
गुलाब जाई निशिगंधांची ।
माझ्या दारीं रानफुलांची ।
बाग विशाला । लखलाभ जयाचें त्याला ॥ २ ॥
मिष्टान्नावरि तुमची झोड ।
रोज नवे जिभलीचे लाड ।
मीठ भाकरी परि मज गोड ।
सुधेचा प्याला । लखलाभ जयाचें त्याला ॥ ३ ॥
कबूल शय्या मखमालीची ।
अन् ओढाया शाल जरीची ।
सर त्याला कां ये कांबळिची ?
रिकाम्या डौला । लखलाभ जयाचें त्याला ॥ ४ ॥
वेडि बागडी माझी राणी ।
लज्जा—शीला सद्गुणखाणी ।
रंग जगाचे नटवे बघुनी ।
वीट मज आला । लखलाभ जयाचें त्याला ॥ ५ ॥

गरीब आम्ही साधे भोळे ।
श्रीमंतीचे चुकार चाळे ।
कोठुनि ठावे ? धुंद न डोळे ।
बोलतो बोला । लखलाभ जयाचें त्याला ॥ ६ ॥
दारिद्र्याचे काढुनि सूर ।
निर्धन अपुल्या गानीं चूर ।
अर्था जाणिल मात्र फकीर ।
प्रभूची लीला । लखलाभ जयाचें त्याला ॥ ७ ॥

--शंकरलाल अगरवाल.

# एकांतांतील अश्रू

## वृत्त—दिंडी

—१—

गेलि सोडुनियां बालिका जगाला
तदा सर्वांना शोक अती झाला
कुणीं रडले काढून उंच हेल
हुंदक्यांनीं पाषाण पाझरेल

—२—

रुदन करितां वा अश्रु ढाळतांना
कुणाच्या तो दिसला न डोळियांना
तयां ताडियले वाक्शरें तयांनीं
उशी त्याची परि पाहिली न कोणी

--गो. रा. दोडके

४८३०

# प्रतीक्षा

[ गज़ल ]

विरहार्त श्रांत बाला – किति काळ वाट पाही ।
आधार ना लतेला – हृत्कंप कंप देही ॥
स्मृतिचित्र अंतरीचें – जीवास खेळवीते ।
'येतील आज' आशा– हृदयास चाळवीतें ॥
मूर्ती तुझी कुमारा – नेत्रांत नाचते ती ।
किति दूर तूं परंतू – कधि लागशील हातीं ? ॥
बघ फूल ही सुकाया – लागे मख्या सुकाया ।
ही दुष्ट वेळ जाया – झुरते मनांत जाया ॥
या या अतां जिवा या! – ऐकोनिया रवा या ! ।
ही भावना विराया – सुखवा हसोनि राया ॥
कीं गुतले कुणाच्या – मोहुनि प्रेमपाशीं ।
सुमनास कुस्करोनी -- विसरोनि दीन दासी ॥
भुलला असेल कमलां– सखये मिलिंद माझा ।
मृदु रम्य पद्म कोषीं – कीं बंदिवान झाला ! ॥
घेसी कुठे भरारी – गगनांत रे दिलासा? ॥
कासार मानसीचें – सोडोनि राजहंसा ! ।
ही चंद्रिका उदेली, – मज हासते सदाची ।
'बघ नाथ चांद माझा'- हिणवीत शल्य टोची ॥
अल्गूज हें तुझें रे -- मधु गोड गान गातें ।
घुमते लकेर कानीं – अनुकारुनी पहाते ॥

छे! ते कुठे जमाया – कांहींतरीच निघते।
नि:शब्द शब्द येती – ते ऐकतें नि रमतें॥
असतील ते कुठेही – भलतें मनांत येई
छे! छे!! नसेल ऐसे – मी संशयींच बाई!॥
वेडी म्हणाल मातें – नाथा म्हणा खुशाल।
क्षणमात्र वेडपीला – पडुं द्या हृदीं विशाल॥
दुश्यंत कांत कैसे, – भुलला शंकुतलेला?।
ही मुद्रिका कपोलीं– विसरास वारण्याला॥
आलेंच पत्र 'त्यांचें'– येणार खास आज।
स्वर्गीं रहावयातें – स्वर्गांत स्वर्गराज॥

—राजा वढे

# वाक्प्रहार

[ छन्द–दिंडी ]

सहज लीलेनें झाडिला तमंचा
ऊर झाला बंबाळ सावजाचा
विकल झाला तो जीव जायबंद
मनीं झाला संतुष्ट परी व्याध

तूंहि बोलुनि गेलास शब्द चार
हृदय गेले ते करुनि आरपार
जाहलों मी नि:शब्द दीनवाणा
तुला बघुनी तें तोष जाहला ना?

—भ. श्री. पंडित

## ' तळमळ '

[ जातिः—मुद्रिका ]

मी हात सुखानें घालुं कुणाच्या गळां
मी कशास राहूं येथें मज नसे कुणाचा ळळा
मज एक जिवाचा नसे सखा सोबती
हा स्नेहशून्य स्वार्थाचा साहरा दिसे भोंवतीं
वंचना इथे लोचनां दिसे सारखी
या पापपूर्ण कान्तारीं कोठची जिवाची सखी
विक्राळ घोर अंधार दूर कोन्दला
ती एक भाव तेजाची लोपली घनीं चंचला
हें असें दिसें वरिवरी तसें अंतर
रे उदास माझ्या जीवा कुणि नसे जगीं सुंदर
बेताल ध्येयशून्यता वसे अन्तरीं
मज कळे न कोठें जाते ही मानवता नाचरी
घनदाट तमीं धावतां जीव भागला
मी व्याकुळ झंझावाता ये वाहुनि नेई मला

—ना. घ. देशपाण्डे, बी. ए.

# दोन चित्रें

( सुनीत )

हें चित्र पहा---

काळें भोर सुरेख केस रुळती पाटीवरी स्वैरसे
होतां बंधनमुक्त मोद मनिचा ते दाविती राजसे !
खालीं दृष्टि न ये, खिळे तव मुखीं ना पापणी हालते
चित्तीं भेदक घाव घोर बसुनी होती अती हाल ते
छद्मी हास्य छचोर भाव सुचवी वृत्ती जरा नाचरी
दृष्टी यौवनधुंद मादक तुझी बेभान चित्तां करी
रूपें मूर्त रती रतीभरहि ना सौंदर्यशोभा उणी
शुद्ध प्रेम न; काम-भाव उपजे पाहूनि तीतें मनीं

आणि हें चित्र पहा---

डोईचा सरके जरा पदर ना ती जातसे कामिनी
दृष्टी भू-गत सारखी विनतशी मांगल्यमंदाकिनी
शोभे बिल्वदलादिपूजनविधी साहित्य सारें करीं
ऐशा आर्यकुलांगनेस बघतां ये पूज्यता अंतरीं

:: :: ::

सारें सृष्टि-रहस्य गूढ न मुळीं जाणूं शके मानव
सौंदर्यीं समता असूनि हृदयीं हो भिन्नभावोद्भव

--अनंत ओक

# भारतमाता

[ त्यजि भक्तासाठीं लाज--या चालीवर ]

हे नमन तुला भू-माय ! तूं सकल जगाची जननी ध्रु०

जगताच्या बालवयांत,
राष्ट्रांच्या अज्ञानांत,
जी झाली भूषणभूत,
परमोच्च पदावरि बसुनी ॥ १ ॥

संस्कृती धर्म-सत्याची,
विश्वाच्या आधाराची,
शोभली सुमंगल जीची
दावूनी अद्भुत करणी ॥ २ ॥

वद, राष्ट्र कोणतें जगलें
जें तिचें दुग्ध नच प्यालें ?
सर्वस्व हरुनि हा नेलें !
ती माझी अबला जननी ॥ ३ ॥

हा भानू भारत-भूचा
पाश्चात्य तिमिरमेघांचा
होतांच स्पर्श दास्याचा
तेजोहिन गेला बनुनी ॥ ४ ॥

परि पश्चिम संध्याबाला
राहीलचि मुग्धा विमला
एकली कोठवर बोला,
प्राचीच्या सुहृदा सोडुनि ॥ ५ ॥

तें असो कसेंही; आज
ती अधोगतीची नीज
देशास लागली, समज
अपमृत्यू आला नयनीं ॥ ६ ॥
मी दुर्बल कितिही असलों
दारिद्र्यपंकिही फसलों,
दुर्दैवहि घाले घालो
सारखेच चोहींकडुनी ॥ ७ ॥
परि एक जिवाची आस,
कीं निश्चय समजा खास,
तिजसाठीं झिजवुन देह
मृत्यूही आला ओढुनि ॥ ८ ॥

वा. रा मोडक.

## मुहूर्तं ज्वलितं श्रेय:

सुहास्य कलिका करी उमलुनी लतांकावरी ।
जगीं दरवळे तिच्या परिमलांतली माधुरी ॥
परार्थ निज-जीवना क्षणिक, वेंचुनी यापरी ।
जगास मुकली तदा चिमुकली कळी हांसरी ॥
परम उज्वल हें चरित नित्य सांगे ।
सकल जगताप्रति लता सानुरागें ॥
सुता-चरिता कथितांच लता-माता ।
येइ वसुधेच्या तुहिन–नीर नेत्रां ॥
नरा ! कथितसे कळी नव सदैव कानीं तुझ्या ।
असो क्षणिक आयु हें, चमकुनी परी त्यांत जा ॥
रडेल जग सर्व हें तव वियोग होतां क्षणीं ।
असा प्रिय जगास हो, जनहितीं जिणें वेचुनीं ॥

—पु. ना. वीरकर, बी. ए.

# अंतिम इच्छा

[ भैरवी ]

अमूर्त मूर्त मूर्तिमंत एकवार पाहुं दे
येत शरण मरणा मी, स्मरण मात्र राहुं दे
चाळवूं नकोस जीव
आस मानसीं अतीव
कालपाश प्रीततंतु गुंत रम्य होउं दे
विकसल्या पुऱ्या कळ्या
गळुनि जात पाकळ्या
अखेरचेंच जीवनांत शीर्ण सुमन वाहुं दे
काल येतसे समीप
मालवेल हाय दीप
थांब हा पतंग नीट त्यांत जळूनि जाउं दे
कसें तयास सावरूं
उडत जीव पाखरूं
नयन–मुक्तमौक्तिकें तयास दोन सेवुं दे
राहसी कुठें लपून
टाकिशी पदें जपून
विश्व व्यापला असून शून्यताच लाहुं दे
लाउनी हळूंच हात
आवळूं नकोस गांठ
एकदांच ही अखेर गांठ पडुनि जाउं दे

थरथरत्या ओठांतुन
अडखळत्या बोलांतुन
प्रीतीची हीच ओळ फिरुनि फिरुनि गाउं दे
पाहतोस काय अंत
प्रेम हे सख्या अनंत
अंतरांत दिव्य ज्योत अंत लीन होउं दे

— राजा बढे

# आज जाऊं दूर रानीं

( वृत्त—वारुणी )

प्रीत माझी ये भराला वेळ ही सौंदर्यशाली
आज जाऊं दूर रानीं साजणा रे सांज झाली
आजपावेतों जगाचे पाश होते प्राक्तनीं हे
स्वैरता घेतील आतां अन्तरें सङ्कोचलेलीं
मी गडे माळीण भोळी कण्ठि या घालीन माळा
लाघवानें पुष्पहारा गुम्फणारा तूंच माळी
ये गडे विश्वास निन्दू प्रीतिच्या तालांत हिण्डू
ही निशा गुम्फील आतां चान्दण्यांची शुभ्र जाळीं
श्रांत जीवा शांतवाया गालिचे दुर्वाङ्कुरांचे
ये तिथें वाचून लाजू अंतरांचे लेख गालीं
वित्त विद्या मान सारे तुच्छतेनें ये झुगारूं
व्यावहारी या जगाचा कायदा जीवास जाळी
कायदा तेथील न्यारा ये करूं वेडाच सौदा
प्रेम दे अन् प्रेम घे अन् यौवनाची ही नव्हाळी

—ना. घ. देशपांडे, बी. ए.

कवियित्री—कु. विमल मोहनी ]

# लतिकाताईच्या सुमनची तक्रार!-

सुमनः— १

आई बघ हा भ्रमर मला ।
पुन्हां वेडवाया आला ॥
सारे जण अजुनी निजले ।
गूंजारव याचा चाले ॥
आई नाहीं कुणि त्याला ।
चुकतां रागें भरण्याला ॥

सुमनः— २

लपत छपत धांवत येतो ।
उगाच कानीं ओरडतो ॥
जर मी थोडें घाबरल्यें ।
काय त्यांत याचें गेलें !॥
आपण तर काळाकुट्ट ।
नाक दुज्या लावी दुष्ट ॥

लतिका:—

काय जाहलें ? ।
कोण बोललें ? ।
सांग छबुकले ।
सांग बाळ सारें मजला ।
रागावूं त्या भ्रमराला

दुसऱ्या हंसतो ।
त्या चिडवीतो ।
खोड्या करितो ।
हांस म्हणावें स्व-रूपाला ।
नंतर चिडवी दुसऱ्याला ॥२॥

३

दहिवरदादानें मजला ।
दिधलेली मौक्तिकमाला ॥
तोडुन यानें टाकियली ।
मोत्यांची जाळी नेली ॥
कालच तूं मज खाउ दिला ।
या मधुपानें लांबविला ॥

चोर बिलंदर ।
न बोललें तर ।
येई भरभर ।
'गडि फू सोडुनि दे' सांगे । मजही ऐकावे लागे ॥३॥

४

आई तो मज आवडतो । पण् कां ग ऐसें करतो ?॥
निरोप जरि मी सांगितलें । तरि ते यानें पोंचविले ॥
शांत समयिं या भ्रमरानें । रिझवावें मज निज गानें ।
थकलें बाई ।
खोड्यापाई ।
याच्या आई ।
किती चांगला जरि असला । हा दुर्गुण त्याला नडला ॥४॥

५

बघ आई हा बघ आला । समजावी थोडें त्याला ॥
भ्रमरा आतां केव्हांही । चिडवायाचें मज नाहीं ॥
ऐकायाचें जर नसलें । तर मैत्रीचे दिन सरले ॥

भ्रमर:–

हो ! हो ! बाई ।
थांबा ताई ।
कां ही घाई ? !
काय असे पण् फण्कारा । माफि मागतो, क्षमा करा ॥५॥

—कु. विमल मोहनी

# गुलाबकळी

मित्रा, या कलिकेस काय म्हणुनी त्वां व्यर्थ रे तोडिलें!।
सौंदर्यें नटली, सुरेख फुलली, नाहीं असें पाहिलें ॥
कोणीही इजला; न लोलुप मनें आले तुटोनी अली।
सेवाया सुरभी; अहा! रसिकता दुःखप्रदा जाहली॥

सौगंधा अवनीवरी नच हिनें वायूवरी प्रेषिलें ।
आईच्या बसुनी कडेवर स्वतां नाहीं सुखा सेविलें॥
कोणा हांसविलें न आपण कधीं मोदस्थिता हांसली ।
सौंदर्या भुलुनी न दृष्टि रसिकीं एकाग्र ती रोंविली ॥

कां बाई कलिके मलीन दिससी? कां चारुता लोपली?।
एका मागुनि एक गाळिसि बये कां पांकळी पांकळी ?॥
"सौख्यातें न स्वतां कधींहि वरिलें; केलें न लोकां सुखी।
आलें व्यर्थ जगांत!" शब्द असले आले तियेच्या मुखीं ॥

* * *

हा मृत्यो! पडणें अम्हां तव करीं हें निश्चितीं जाणतों।
भोगूं दे तर जन्मलाभ सकलां दातृत्व हें याचितों ॥

--वामन सहस्रबुद्धे.

# 'मीं गांधी संगें रक्षिन भू-मातेला'

धांवूनी
पदर ओढुनी
गोड हांसुनी
म्हणे आईला
मी येइन संगे, तुझिया, या वेळेला !
चुकवुनी
नित्य टाकुनी
घरीं ठेवुनी,
नेशि ताईला
मी नावडता का ? अश्रु येत नयनाला !
उचलुनी
पोटिं लावुनी
झणीं चूंबुनी
वदे बाळाला
वद भाउ कधीं का ये हळदीकुंकाला ?
तूं शूर
होवुनी वीर
द्यावया धीर
मातृ-भूमीला
जाशिल ना बाळा ? संगरि मग लढण्याला
ऐकुनी
बोल त्या क्षणीं
झणीं उतरुनी
वदे आईला
मी गांधीसंगें रक्षिन भू-मातेला !

—सौ. मनोरमाबाई नावलेकर

# सविकल्प समाधि

( शा. वि. )

—१—

माझ्या प्रेमळ शाहिरा ! पुरविण्या
माझी मनोवांच्छना
एखादें तव भावगीत मजला
गाऊनि दाखीव ना;
शेजारी बसत्यें तुझ्या कुतुकुनी
मी शांत तें ऐकत
औत्सुक्यें नयनांतल्या उमजुनी
घे सर्व मद्हृद्गत

—२—

कां शंकाकुल लोचनीं निरखिसी
माझ्या मुखा राजया ?
जाई लेश न कां त्वदीय हृदया
स्पर्शूनि माया दया ?
लज्जारक्त मलीन लीन वदनीं
मी खालती पाहत्यें
कष्टानें उचलूनि आणि नयनें
निश्वास मी टाकितें

— ३ —

येती पारखतां न काय तुज ही
डोळ्यातली आसवें ?
हें ओठावरलें निरागस हसें
वाटें तुला कां नवें ?
पूर्वप्रीति तुझी अपूर्व अथवा
ती सर्वथा लोपली ?
ती वृत्तीमधली रसप्रवणता
मुळांत कीं आटली ?

— ४ —

किंवा ही सविकल्प, देखुनि मला,
लागे समाधी तुझी
जाह्यें मी कशि आपुली जर असा
तूं स्वस्थ निष्काळजी
जातां ओढुनि मागुनी पदर कां
आलाप घेसी वृथा ?
इच्छेची अवमानिल्यावर नको
व्हाया अशी पूर्तता !

—भ. श्री. पंडित



# ?

## Love ... ...The Eternal Tragedy

ती चिमुकली कलिका होती. होती खरीच एक लावण्यमयी प्रतिभा ! तिचं जीवित लीलामय होतं...... पण...तिच्या चंचलतेचं मात्र जगाला अजूनही गूढच होतं

वसंताच्या ललितमधुरस्पर्शानं वसुंधरेचं अंगप्रत्यंग पुलकित झालं. मंद समीर लाजऱ्या वल्लरींच्या आणि मुग्ध मंजिरींच्या खोड्या करीत पानांच्या दाटींत लपायला लागला...परंतु ही म्लानवदन कलिका मात्र लतिकेच्या अंकावर मान टाकून पडली होती. तिला बरं नव्हतं........तिच्या हृदयांत कसली तरी व्यथा होती ... कुणीतरी तिला दुखवलं होतं.

वसुधेच्या रुपसौंदर्यानं लाजलेली संध्या, जलवंतीच्या शांत जलांत आपलं सौंदर्य निरखीत होती. मिलिंद कलिकेची गोड कुजबुज सुरू झाली .. त्याच्या संगीतानं तिला भारलं मिलींदाच्या संगीत आलापांनीं प्रेमदूताचं काम केलं ...भ्रमरगीत प्रेमसंगीत ठरलं....कलिकेला कसंसंच झालं ...ती आंतल्याआंत हंसली....तिला कुणी गुदगुदल्या करीत आहेसं वाटलं .. पण त्या मधुमधुर आनंदांत ती आपलं दुःख पार विसरून गेली ..

मध्यरात्रीची वेळ...प्रेम, पाउलांची चाहूल न लागूं देतां कलिकेच्या हृदयांत हळूंच शिरलं तिला त्यानं खूप चाळवलं... रडवलं....पण त्यांतच ती स्वर्गसौख्य अनुभवित होती तिचा गोड

आनंद हृदयांत मावेना...सदाची लाजरी कलिका सकाळ होतांच एकदांच खदखदून हंसली...तिचं हृदय फुटलं...पाकळ्यांची मातींत पखरण झाली...निर्दय प्रेम तिथून उडून गेलं...!

× × ×

ही लीला तो पहात होता. त्यांतलं रहस्य त्याला कळलं नाहीं ...पण त्या सौंदर्य–मोहानं तो कवि झाला. कलिकेचे कविराज सौंदर्यशोधनासाठीं वेडे झाले.

मध्यरात्रीं प्रेम जेव्हां कविहृदयाशीं खेळायला आलं त्याच वेळीं एका अपूर्व संगीतालापानीं वातावरण निनादित झालं...त्यांतील शब्दाशब्दांतून सौंदर्य आणि सौख्य निथळत होतं...विश्वचैतन्य त्यांत भरलेलं होतं...कवीनीं कलिकेच्या रहस्याची त्यांत सांठवण केली... कलिकेच्या व्यथेची त्याला नुकतीच कुठें जाणीव होऊं लागली होती...

परंतु प्रभात व्हायचा अगोदरच प्रेम कवि हृदयांतूनही पसार झालं...तत्काळ कविच्या हृदयवीणेची ताणलेली तार तुटून गेली... कलेच्या नाजुक तंतुंनीं विणलेली माळ अपूरीच राहिली.. ..कवीला स्वतःच रहस्य देखील उमगलं नाहीं.. ..!!

—महेश कौल.

विश्राम

ग्रंथ संग्रहालय
क्र. ८६२०

REFBK-0004937
REFBK-0004937

## कार्यकारी मंडळ १९३२

अध्यक्ष -- बढे, रा. नी.

कार्यवाह -- वसंत राजे

स. कार्यवाह--पतकी, वि. स.

संपादक -- ओक, अ. वा.

स. -- बट, श. शा.

सभासद -- [illegible] अं. मा.

,, --सदावर्ते, पु. न[illegible]

---

## मंडळाचीं संकल्पित पुस्तकें.

(१) लघु-कथासंग्रह

(२) गिरिजेचा संसार [खंड काव्य]

श्री. ना. घ. देशपांडे

(३) मंदस्मित [खंड काव्य]--राजा बढे